# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल. पदवीसाठी " श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या उपयोजित समीक्षेचे स्वरूप " या विषयावरील लघुशोधप्रबंधासाठी प्रा. डॉ. वि. दा. वासमकर यांचे प्रोत्साहन व मार्गदर्शन मला लाभले. त्याचा थोडक्यात मी येथे ऋणनिर्देश करीत आहे. खरं तर शब्दात सरांची महती सांगणे हे तसे अवघड काम आहे. सरांबद्दल माझ्या मनातील आदराची भावना व एकंदरीतच सर्व विद्यार्थी वर्गाची सरांबद्दलची असलेली आदराची भावना व्यक्त करण्याची संधी मला या लघुनिबंधाच्या निमित्ताने मिळाली.

आदरणीय गुरुवर्य प्रा. डॉ. वि. दा. वासमकर हे मला गुरू व मार्गदर्शक म्हणून लाभले हे मी माझे भाग्यच समजते. प्रस्तुत विषय हा समीक्षा विषय असल्याने विद्यार्थ्यांना जरा अवघडच वाटतो तसा तो मलाही वाटत होता. पण प्रा. डॉ. वि. दा. वासमकर यांचा ' समीक्षा ' हा आवडता विषय असल्याने व त्यांच्या पीएच. डी. साठीचा विषयही समीक्षा विषय असल्याने त्यांनी मला या विषयासाठी उद्युक्त केले व माझी ' समीक्षा ' विषयाबद्दलची भीती दूर पळवून लावली. सरांची शिकविण्याची पद्धत मला मी एम. ए. ला असल्यापासून परिचित होतीच, पण त्यांचा प्रेमळ स्वभाव व विद्यार्थ्यांना समजून घेऊन अभ्यास समजावून सांगण्याची पद्धत या लघुप्रबंधाच्या निमित्ताने समजली. त्यांची विद्यार्थी वर्गात असलेली लोकप्रियताही या काळात मी जवळून पाहिली. प्रत्येक विद्यार्थ्यांशी आपलेपणाने व खेळीमेळीने वागण्याची त्यांची सवय यामुळेच त्यांनी विद्यार्थ्यात आपलेपणाचा असा एक वेगळा ठसा उमटवलेला आहे. मन लावून शिकवणे ही त्यांची खासियतच आहे. कोणताही प्रश्न विचारला तरी त्याचे उत्तर ते न कंटाळता सांगतात. तसेच प्रत्येक वेळी ते शुद्धलेखनाबद्दलही अतिशय आग्रही असतात. प्रत्येक शब्दाची शुद्ध लिहिण्याची पद्धत कोणती व का ? हे ते समजावून सांगताना कधीही कंटाळत नाहीत. प्रस्तुत लघुशोधप्रबंध लिहीत असताना अनेक वेळी कामात असताना सुद्धा त्यांनी मला नेहमीच आनंदाने मार्गदर्शन

केले. समीक्षेसारख्या विद्यार्थ्यांना किचकट वाटणारा विषयही ते अगदी सोप्या भाषेत सांगतात, याचा मला नेहमीच फायदा झाला आहे.

भारतीय संस्कृतीत गुरूंना अनन्य साधारण महत्त्व आहे. मला त्यांच्यासारख्या गुरुंचा लाभ झाला हे मी माझे परमभाग्यच समजते. गुरूंनी दिलेले ज्ञानाचे दान हेच शिष्याचे खरे धन असते. मला विद्यारूपी दान देऊन त्यांनी माझ्यावर जे उपकार केले आहेत ते ऋण कधीही न फिटणारे असेच आहे व त्यांच्या ऋणात राहण्यातच मी धन्यता मानते. उच्चविद्याविभूषित गुरुपत्नी सौ. रेखा वासमकर यांच्या सहवासात नकळत त्यांच्याकडून काटेकोर शिस्तीचे पण मृदू वक्तव्याचे धडे गिरवले गेले. हाही लाभ मला अनायासे झाला. त्यांचीही मी ऋणी आहे.

या लघुशोधप्रबंधाचे काम करीत असताना शिवाजी विद्यापीठातील मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. विश्वनाथ शिंदे तसेच प्रा. डॉ. कृष्णा किरवले, प्रा. डॉ. रवींद्र ठाकूर, प्रा. डॉ. रणधीर शिंदे तसेच प्रा. डॉ. हिमांशू स्मार्त या सर्वांचे सहकार्य व उत्तेजन मिळाले त्या सर्वांची मी आभारी आहे.

शिवाजी विद्यापीठातील बॅ. खर्डेकर ग्रंथालयातील मौलिक ग्रंथांचा मला लाभ झाला. तेथील ग्रंथपाल आणि त्यांचे सहकारी यांची मी आभारी आहे. तसेच विलिंग्डन महाविद्यालयातील ग्रंथाचाही मला वेळोवेळी उपयोग झाला. तेथील ग्रंथपाल श्री. रास्ते सर तसेच इतर कर्मचारी वर्ग यांनी मला नेहमीच सहकार्य केले. त्यांचीही मी आभारी आहे. तसेच एम. टी. अग्रवाल नगरवाचनालय माधवनगर, जि. सांगली येथील मौलिक ग्रंथ उपलब्ध झाले. त्यांचीही मी आभारी आहे. माझे गुरु बंधू श्री. रवींद्र दोरकर यांचे सहकार्य तसेच कु. सुवर्णा जाधव व कु. वैशाली जाधव यांचा स्नेह व सहकार्य मिळाले. तसेच सिद्धी कॉम्प्युटर्सचे चालक श्री. व सौ. गुप्ता यांनी ग्रंथ सुरेख टंकमुद्रित करून दिला त्यांचेही मन:पूर्वक आभार.

**सुमेधा प्रमोद वारे**

# अनुक्रमणिका


* **प्रस्तावना :** **श्रीपाद कृष्ण यांच्या जीवनाविषयी थोडेसे : कालखंड १८७१-१९३४ - पृष्ठ क्र. १ ते ६**

श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांची साहित्यसंपदा

* **प्रकरण पहिले :** **समीक्षेचे स्वरूप व श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांची तात्त्विक समीक्षा - पृष्ठ क्र. ७ ते ३३**

प्रस्तावना, समीक्षेचे स्वरूप, भारतीय व पाश्चात्य विचारवंतानी केलेल्या समीक्षेच्या व्याख्या, समीक्षा-तात्त्विक व उपयोजित, साहित्य व समीक्षा परस्पर संबंध, समीक्षेचे प्रयोजन व कार्य, समीक्षा शास्त्र की कला, कलावाद व जीवनवाद, कलावाद म्हणजे काय? कलेची द्विध्रुवात्मकता, कांटची कलेबाबतची भूमिका, स्वायत्त सौंदर्य व परायत्त सौंदर्य, विश्वचैतन्यवादी विचार, श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांची तात्त्विक समीक्षा, श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या तात्त्विक समीक्षेतील साहित्यकृतीचा स्वरूपविचार, श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या तात्त्विक समीक्षेतील साहित्यकृतीचा प्रयोजन विचार, श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या तात्त्विक समीक्षेतील साहित्यकृतीचा परिणामविचार, रसविचार, समारोप.

* **प्रकरण दुसरे :** **श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या उपयोजित समीक्षेतील साहित्यकृतीचा स्वरूपविचार - पृष्ठ क्र. ३५ ते ६६**

प्रस्तावना, कोल्हटकरांची उपयोजित समीक्षा-कलावादी भूमिकेला विसंगत, साहित्यकृतीचा सत्ताशास्त्रीय विचार, साहित्यकृतीतील आशयविचार, देवल यांच्या 'संगीत शापसंभ्रम' यावर टीका : ज्ञानाची अपेक्षा, सुधारणावादी कोल्हटकर, नीती-अनीती, श्लील-अश्लील, श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांच्या उपयोजित समीक्षेतील कार्यकारणभाव व तार्किकता, कोल्हटकरांचा भाषाविचार व रचनाविचार, वीरतनयाची ढाल, औचित्यविषयक दोष, संविधानकाचे सेंद्रियत्व-आशयाचा आकार, समारोप.

* **प्रकरण तिसरे** : **श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या उपयोजित समीक्षेतील साहित्यकृतीचा प्रयोजनविचार** - पृष्ठ क्र. ६७ ते ८७

प्रस्तावना, साहित्याचे प्रयोजन-संस्कृत भाष्यकारांचे मत, प्लेटोचा नीतिवादी सिद्धान्त, ॲरिस्टॉटलचे कलेविषयीचे मत, टॉलस्टॉयचे कलेबाबतचे मत, आणखी काही तत्त्ववेत्त्यांची कलेच्या बाबतीतली मते, मार्क्सवादी भूमिका, रा. भा. पाटणकरांचा नीतिविषयक दृष्टिकोण, श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचा नीतिवादी दृष्टिकोण, कोल्हटकरांच्या उपयोजित समीक्षेतील प्रयोजनविचार, नीतिप्रतिपादन, तत्त्वप्रतिपादन, सामाजिक बांधिलकी, उद्‌बोधन किंवा ज्ञान देणे, जीवनदर्शनाचा हेतू, प्रचार, समारोप.

* **प्रकरण चौथे** : **श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या उपयोजित समीक्षेतील साहित्यकृतीचा परिणामविचार** - पृष्ठ क्र. ८९ ते १०४

प्रस्तावना, परिणामाबाबतच्या विचारात नीतीला अग्रगण्य स्थान, तात्त्विक कादंबरीपासून होणारा लाभ, तादात्म्याने आनंदप्राप्ती, 'पण लक्षात कोण घेतो !' या सामाजिक कादंबरीचा परिणामविचार, श्लील-अश्लील, संस्कारवादी भूमिका, सेंद्रिय परिणाम, रसविचार, रसविघ्ने, भाषाविचार, समारोप.

* **प्रकरण पाचवे** : **उपसंहार** - पृष्ठ क्र. १०५ ते ११६

संदर्भ ग्रंथ सूची : पृष्ठ क्र. ११७ ते ११८



श्रीपाद कृष्ण कोल्हटकर
इ.स. १८७१ – १९३४

# प्रस्तावना

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे एक मराठीतील महत्त्वाचे समीक्षक म्हणून ज्ञात आहेत. त्यांनी तात्त्विक आणि उपयोजित स्वरूपाची समीक्षा लिहिली आहे. " टीकाविषय बनलेला ग्रंथ खूप खोलात आणि तपशिलात जाऊन ते तपासतात. त्यामुळे त्यांची समीक्षा ही तात्त्विक चिकित्सा, रूक्ष विवेचन आणि परीक्ष्य ग्रंथातील व्याकरण शुद्धलेखन इत्यादी सर्वांगीण दोष दिग्दर्शन करणारी अशी झाली आहे." (१)

कोल्हटकरांनी आपल्या टीकालेखन पद्धतीने अनेक नवे दंडक निर्माण केले आहेत. त्यांनी आपल्या लेखनात वाङ्मय टीकाकार या नात्याने वाङ्मय विचार प्रत्यक्षात उतरवला. वाचकांना नवी वाङ् मयीन आवड निर्माण होण्यासाठी कोल्हटकरांच्या टीकालेखनामुळे पुष्कळच उपयोग झाल्याचे दिसून आले आहे. संस्कृत साहित्यशास्त्राच्या मजबूत पायावर उभी असलेली मराठी साहित्यसंपदा आणि पाश्चात्य साहित्यशास्त्राच्या आधाराने त्यांनी मराठी साहित्यशास्त्राला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवण्याचे बहुमोल कार्य त्यांनी करुन ठेवले आहे. मराठीतील साहित्यविचारनिर्मितीची त्यांच्या आधीची पोकळी त्यांनी भरुन काढली आणि मराठी वाचकाला मराठी साहित्याविषयीची एक नवी दृष्टी त्यांनी आपल्या टीकालेखनाद्वारे मराठी रसिक वाचक जाणकारास करुन दिली.

कोल्हटकर जसे कलाप्रेमी होते तसेच ते सुधारणावादाचे प्रसारकही होते. त्यांच्या अनेक टीकालेखामधून त्यांची टीकाविषयीची आपली भूमिका स्पष्ट केली आहे. टीकाकाराने स्व-मताचा आग्रह न धरता तटस्थ व समतोलता राखून लेखन करावे असा आग्रह त्यांनी धरला. प्राचीन-अर्वाचीन, संस्कृत-पाश्चात्य तत्त्वविषयक विचारांचा आधार, वाङ्मयविषयक असलेली नवी दृष्टी अशा विचारांनी परिपूर्ण असल्यामुळेच श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांची टीका स्वत:चे असे एक वेगळे पण मानाचे स्थान प्राप्त करु शकली.

त्यांनी केलेल्या उपयोजित समीक्षेचा विस्ताराने अभ्यास करणे हे प्रस्तुत लघुशोधप्रबंधाचे उद्दिष्ट आहे.

## * श्रीपाद कृष्ण यांच्या जीवनाविषयी थोडेसे : कालखंड १८७१-१९३४

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचा जन्म २९ जून १८७१ साली नागपूरमध्ये झाला. आजोबा हरिपंत हे उत्तम गायक, चुलत आजे महादेवशास्त्री हे उत्तम वक्ते आणि ' ऑथेल्लो ' चे भाषांतरकार म्हणून प्रसिध्द, चुलते वामनराव सुधारक, चुलत बंधू अच्युतराव पत्र व्यवसायात ख्यातनाम ' संदेशकार ' म्हणून नावाजलेले, तसेच वडील नाट्य आणि संगीताचे चाहते असल्यामुळे या सर्वांचा परिणाम श्रीपाद कृष्णांवर न पडला तर नवलच. बालपणापासूनच या सर्व थोर मंडळींचे संस्कार श्रीपाद कृष्णांवर झाले. त्यामुळेच त्यांच्यावर संगीत, नाट्य, साहित्य, सुधारकी विचार, रसिकता या गुणांचे अमृतसिंचन झाले व प्रगल्भ बुद्धीचे तेज त्यांच्या ठायी दिसून येऊ लागले.

लहानपणीच आलेले शारीरिक व्यंग व त्यामुळेच आलेली एकांतप्रियता यामुळे इतरांपेक्षा आपण अधिक हुषार आहोत हे दाखवण्याची जिद्द त्यांच्यामध्ये निर्माण झाली. या ध्यासापोटी त्यांनी मिळतील ती पुस्तके वाचण्याचा सपाटा लावला. विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या बंधू सारखे शिक्षक त्यांना लाभले. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन त्यांनी विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या ' निबंधमालेचे ' अक्षरशः पारायणे केली आणि आपले काही आदर्श त्यांनी निश्चित केले. जन्मभर त्यांनी हे ऋण स्वीकारले.

अफाट वाचनाने त्यांना व्यासंगी बनवले. निबंधमालेप्रमाणेच त्यांनी ॲडिसन, गोल्डस्मिथ, स्कॉट यासारख्या पाश्चात्य ग्रंथकाराचे ग्रंथ वाचून काढले व त्यामुळे मराठी प्रमाणेच इंग्रजी भाषेवरही त्यांनी स्वामीत्व मिळवले.

१८८८ मध्ये ते मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. नंतर ते डेक्कन कॉलेजमधून बी. ए. झाले. प्रा. सेल्वी, डॉ. भांडारकर आणि त्यांचा शेक्सपीअरच्या नाटकावरील अधिकार सर्वमान्य होता असे प्रिन्सिपल ओक्झनहॅम इत्यादी विद्वान मंडळी त्यांना अध्यापक म्हणून लाभली.

कॉलेज जीवनात संगीत नाट्य, वाङ्मयीन वादविवाद यातून भाग घेतला. न. चिं. केळकर, रघुनाथ शंकर रानडे अशा मंडळींचा सहवास त्यांना लाभला. कायद्याचा अभ्यास

करण्यासाठी काही काळ ते मुंबईत वास्तव्याला राहिले. या सर्वांचा एकत्रित परिणाम असा झाला की श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे निरनिराळ्या प्रांतात आपले ज्ञान पारखून घेऊ लागले. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला व श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचा टीकाकार म्हणून उदय झाला.

" कोल्हटकरांनी लेखन क्षेत्रात पहिले पाऊल टाकले तेच मुळी टीकालेख लिहून. त्यामुळे त्यांच्या लेखनाची बैठक काय होती हे समजून येते. समोर आलेल्या ग्रंथाच्या आविष्कार पद्धतीतील गुण वा दोष दाखविणे एवढा मर्यादित हेतू ठेवून लेखन करण्याची कोल्हटकरांना आवड नव्हती." (२) त्यांच्या लेखनात समाजहितदृष्टी आणि कलादृष्टी यांचा उचित मिलाफ झालेला दिसतो. परंतु हा त्यांच्या व्यासंगाचा, अभ्यासाचा, सखोल चिंतन-मननाचा परिणाम असल्यामुळे त्यांच्या टीकालेखात एकप्रकारे आत्मविश्वास प्रत्ययाला येतो. या आत्मविश्वासालाच कधी टोकदार, भेदक आणि धारधार अशा शैलीची जोड मिळून तो लेख म्हणजे प्रखर शस्त्राघात वाटतो." (३)

कोल्हटकरांचा पहिला लेख म्हणजे 'विक्रम-शशिकला' नाटकावरील परीक्षण लेख होय. तो १८९३ मध्ये 'विविध ज्ञान विस्तार' मधून छापून आला. त्यांच्या टीकेत व्यासंगाचा पुरेपूर प्रत्यय येतो. कोल्हटकरांनी 'विक्रम-शशिकला' नाटकाच्या परीक्षणात, " नाटकाचा मुख्य उद्देश सद्‌गुणापासून होणारे फायदे व दुर्गुणापासून होणारे तोटे लोकांच्या मनावर ठसवावे हा असल्याचे " (४) म्हटले आहे. त्यांची टीकापद्धती इंग्रजी टीकापद्धतीप्रमाणे होती. अशा पद्धतीने टीकालेखन करणारे कोल्हटकर हे मराठीतील पहिले टीकाकार आहेत. त्यांनी काही साहित्य विषयक सिद्धांतही मांडले. त्यांच्या भाषाशैलीचे आणि विचार पद्धतीचे जनमानसात कौतुक होऊ लागले. देवलांच्या 'संगीत शापसंभ्रम' या नाटकावरील प्रतिक्रिया लिहून त्यांनी आपल्या लेखणीचे चापल्य दाखवून दिले. हे एक प्रकारचे मोठे धाडसच श्रीपाद कृष्णांनी करुन दाखवले. त्याकाळी नावाजलेले गोविंद बल्लाळ देवल यांच्या नाटकावरील टीकेमुळे कोल्हटकर हे टीकाकार म्हणून नावारूपास आले. श्रीपाद कृष्णांच्या टीकालेखनाचे स्वरूप सांगताना न. चिं. केळकर यांनी कोल्हटकरांच्या लेखसंग्रहाला प्रस्तावना देताना पुढीलप्रमाणे उद्‌गार

काढले आहेत, " त्यांच्या (श्रीपाद कृष्णांच्या) टीकात्मक लेखांतला विनोद तीव्र वक्रोक्तीचा असून, तिचा हेतू टीकाविषयीभूत ग्रंथकाराला चीत करावयाचा असतो. त्यांची टीका सुरु झाली, म्हणजे वाचकाला आपण ती एक शिकार पाहत आहोत असे वाटते, खेळ पाहतो असे वाटत नाही. ग्रंथकाराच्या गैरहजेरीत त्याच्या ग्रंथनिर्मितीचे सावज कोल्हटकरांच्या हाती एकटे सापडले आहे व सर्व प्रकारची घातक बौद्धिक हत्यारे व साहित्य क्रीडेतील सवंगडी पारधी बरोबर घेऊन कोल्हटकर त्याच्यावर तुटून पडले आहेत, असाच भास त्यांचे टीकात्मक लेख पाहून होतो."

कोल्हटकरांनी समाज सुधारणेचे व्रत जरी घेतले होते तरी त्यांचे मन कलासक्त होते. त्या कलासक्त दृष्टीनेच त्यांनी साहित्याचे रसग्रहण केले. त्यांच्या टीकालेखनात व्याकरणिक चुका, सामाजिक सुधारणा, इतिहास संस्कृती, वाङ् मय प्रयोजन अशा अनेक गोष्टींचा ऊहापोह आपणास पहावयास मिळतो. त्यामुळे त्यांची टीका भारदस्त वैशिष्ट्यपूर्ण अशी असल्याचे प्रत्ययाला येते. त्यांनी तात्त्विक आणि उपयोजित अशा दोन्ही पद्धतीने समीक्षा केली आहे.

सन १८९१ मध्ये ते बी. ए. परीक्षा उत्तीर्ण झाले व सन १८९२ मध्ये कायद्याच्या अभ्यासासाठी मुंबईत गेले. सन १८९७ मध्ये ते एल.एल.बी. ची परीक्षा उत्तीर्ण झाले. ' ज्योतिर्गणित ' या विषयाचाही त्यांचा विशेष अभ्यास होता. सन १९१२ मध्ये त्यांचा ' भारतीय ज्योतिर्गणित ' हा निबंध प्रसिद्ध झाला. तसेच सांगलीला सन १९२० मध्ये झालेल्या ज्योतिष संमेलनाचे ते अध्यक्ष झाले. सन १९१९ साली त्यांनी ' आत्मवृत्ता ' चे लेखन केले. विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या काळात मराठी साहित्यात श्रीपाद कृष्ण या नावाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. सन १९२२ मध्ये द्वितीय महाराष्ट्र कविसंमेलनाचे अध्यक्षपद आणि सन १९२७ मध्ये बाराव्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे पुणे येथे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. अनेक प्रतिभावंतांनी श्रीपाद कृष्णांचे शिष्यत्व पत्करल्याने श्रीपाद कृष्ण या नावाला विशेष महत्त्व मिळाले. कोल्हटकरांनी ललित साहित्यातील सर्व अंगांना धरून आपले लेखनकार्य केले. परंतु ते प्रसिद्ध पावले ते त्यांच्या टीकालेखन पद्धतीमुळे व दुसरे म्हणजे विनोदासाठी. श्रीपाद कृष्ण

कोल्हटकरांना आधुनिक मराठी वाङ्मयातील विनोद युगाचे प्रवर्तनकार असे संबोधण्यात येते. त्यांच्या लेखन पद्धतीचा विशेष गुण म्हणजे विनोदशीलता व कोटीबाजपणा. हा गुण त्यांच्या नाटकातून व ' साहित्य बत्तीशी ' यातून निदर्शनास येतो. वक्रोक्तीची आपली हौस त्यांनी आपल्या टीकालेखातून पुरेपूर भागवून घेतली आहे. त्यांच्या टीकात्मक लेखनातील विनोद तीव्र वक्रोक्तीचा असल्याचा दिसून येतो.

श्रीपाद कृष्ण आपला वकिलीचा व्यवसाय अकोला येथे करीत असत. हे करीत असताना ते आपला साहित्याचा व्यासंगही एकीकडे जोपासीत होते. कोल्हटकर आपले ग्रंथपरीक्षणाचे काम करीत असताना ग्रंथाच्या सर्व बाजूचा विचार करीत. कोल्हटकर जसे टीकाकार होते तसेच ते स्वत: वाङ्मयकारही होते. आपल्या टीकालेखनात त्यांनी नवी सौंदर्यदृष्टी आणली. कलावादी भूमिकेची नेटकी मांडणी करणारे ' श्रीपाद कृष्ण कोल्हटकर ' हे प्रथम समीक्षक होत. मराठी टीकाक्षेत्रात आपल्या लेखणीने स्वतंत्र दालन श्रीपाद कृष्णांनी उघडले व स्वत:ची स्वतंत्र ओळख त्यांनी जनमानसात रुजवली.

त्यांचा एवढा प्रचंड व्यासंग पाहता त्यांना आयुष्य मात्र फार कमी लाभले. सन १९३४ मध्ये श्रीपाद कृष्ण आपल्या बंधूच्या पुणे येथील निवासस्थानी वास्तव्यास येऊन राहिले व १ जून १९३४ रोजी सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली.

## ❊ **श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांची साहित्यसंपदा** :

- **नाटके** - वीरतनय, मूकनायक, गुप्तमंजूष, मतिविकार, प्रेमशोधन, वधू-परीक्षा, सहचारिणी, जन्मरहस्य, परिवर्तन, शिवपावित्र्य, श्रमसाफल्य, मायाविवाह.
- **विनोदी लेख संग्रह** - सुदाम्याचे पोहे अर्थात साहित्य बत्तीशी.
- **इतर ग्रंथ** - भारतीय जोतिर्गणित, आत्मवृत्त, कोल्हटकरांचा लेखसंग्रह.
- **कविता** - गीतोपायन.
- **कादंबऱ्या** - कथासप्तक.

याखेरीज विविध संमेलनांच्या अध्यक्ष पदावरुन केलेली भाषणे, ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावना आणि काही प्रासंगिक लेख.

प्रस्तुत लघुशोधप्रबंधात श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या उपयोजित समीक्षेचा विचार करणे अभिप्रेत आहे. श्रीपाद कृष्णांनी उपयोजित समीक्षेबरोबरच तात्त्विक समीक्षाही वेळोवेळी मांडली आहे. या तात्त्विक समीक्षेचे स्वरूप पाहिल्यानंतर कोल्हटकरांच्या उपयोजित समीक्षेत काही विसंगत भूमिका येते का ? याचा शोध घेणे उद्‌बोधक ठरेल. श्रीपाद कृष्णांच्या या समीक्षेचा विचार साहित्य कृतीचे स्वरूप, प्रयोजन व परिणाम या अंगाने करू.

टीप :- प्रस्तावनेत आलेले १ ते ४ हे संदर्भ क्रमांक पहिल्या प्रकरणाच्या संदर्भ क्रमांकात सुरुवातीला आले आहेत.